

| वर्ष - 7 । अंक - 295 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | मंगळवार, दिनांक 12 मार्च 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत


- ‘बारामती’मध्ये शिवतारे अपक्ष उभे राहणार?
- प्रकल्पांना गती देणारा खासदार हवा
- महायुतीत वादाची ठिणगी?


## पिंपरी-चिंचवडमधील प्राधिकरण बाधितांचा

# साडेबारा टक्के परतावा प्रश्न सुटला!

## आमदार लांडगे यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना यश : कॅबिनेट मिटिंगमध्ये निर्णय

। पिंपरी । महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड शहराच्या विकासासाठी स्वतःच्या जमिनी दिल्यानंतरही गेले ५० वर्षांपासून प्रलंबित असलेला साडेबारा टक्के परताव्याचा प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. राज्य सरकारच्या मंत्रिमंडळ बैठकीत याबाबत शिक्कामोर्तब करण्यात आले. त्यामुळे भूमिपुत्रांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.**

पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या हद्दीतील भूसंपादनामुळे बांधित झालेल्या भूमिपुत्रांच्या प्रश्नासाठी अधिवेशनात आमदार महेश लांडगे यांनी सातत्यपूर्ण पाठपुरावा केला आहे. आज मंत्रीमंडळ बैठकीत प्राधिकरण परताव्याच्या निर्णयाला मंजुरी देण्यात आली.

१९७२ ते १९८३ दरम्यान जमिनी संपादित झालेल्या शेतक-यांना सव्वासहा टक्के जमीन आणि 2 चटई क्षेत्र एवढा निर्देशांक (एफएसआय) देण्याची घोषणा शासनाने केली होती. त्यामुळे अनेक वर्षाच्या लढ्याला यश आले. पण, अध्यादेश अद्याप निघाला नव्हता. त्यामुळे भूमिपुत्रांमध्ये नाराजीचा सूर होता.

प्राधिकरण बाधितांच्या न्याय हक्कांसाठी २०१४ ते २०१९ दरम्यान परतावाबाबत आमदार लांडगे यांनी वेळोवेळी अधिवेशनात प्रश्न उपस्थित केला. २०१९ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली दि. १ जुलै २०१९ रोजी झालेल्या बैठकीत पिंपरी-चिंचवडमध्ये आवश्यक जागा शिल्लक नसल्यामुळे ५० टक्के जागा आणि ५० टक्के ‘एफएसआय’ देण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार संपादित क्षेत्राच्या ६.२ टक्के एवढी जमीन तिच्या मालकास प्राधिकरणाच्या अटींच्या अधिन राहून वाटप करण्यात येणार आहे. तसेच, अशा जमिनीचा परतावा करताना २ चटई क्षेत्र एवढा निर्देशांक मंजूर करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने प्राधिकरणाच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये आवश्यक ती सुधारणा करण्यात येणार आहे.

शहराचे राजकीय वर्तुळामध्ये प्राधिकरण परतावा हा विषय कायमस्वरूपी चर्चेत राहिला. अनेक निवडणुकांमध्ये हा विषय प्रचाराचा मुद्दा बनला होता. मात्र आमदार लांडगे यांनी सातत्यपूर्ण पाठपुरावा करीत या विषयाला पूर्णविराम दिलेला आहे.







“ गेल्या ५० वर्षांपासून प्रलंबित प्राधिकरण बाधित १०६ शेतकरी कुटुंबांचा प्रश्नासाठी २०१४ पासून आम्ही तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली पाठपुरावा करीत होतो. २०१९ मध्ये उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत निर्णय घेतला होता. बाधित शेतकऱ्यांना सव्वा सहा टक्के जमीन आणि २ चा ‘एफएसआय’ असा साडेबाराटक्के परतावा देण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी मंजुरी देण्याची घोषणा मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्या बैठकीत करण्यात आली. याबद्दल महायुती सरकारचे मनापासून आभार व्यक्त करतो.

**- महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा**



“ पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने 1972 ते 1983 या कालवाधीत संपादित केलेल्या शेतक-यांना 6.2 टक्के परतावा आणि चटई क्षेत्र निर्देशांक (एफएसआय) देण्याचा प्रश्न निकाली निघाला आहे. आचारसंहिता लागण्यापूर्वी हा प्रश्न सोडविण्याचे आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले होते. ते पाळले असून आजच्या मंत्रीमंडळ बैठकीत 40 वर्षांपासून प्रलंबित असलेला भूमीपूत्रांचा प्रश्न मार्गी लावला. या निर्णयाचा 106 कुटुंबियांना फायदा होणार आहे.

**- श्रीरंग बारणे,** खासदार, मावळ.



“ लोकनेते आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या अनेक वर्षांच्या मागणीला अखेर न्याय मिळाला आहे. उद्योगनगरीतील शेतकऱ्यांच्या सन १९७२ साली जमीन ताब्यातघेऊन औद्योगिक क्षेत्रातील नागरिकांना स्वस्त दरात घरकुल उपलब्ध करून देण्याच्याउद्देशाने पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण (PCNDTA) स्थापन करण्यात आलेपरंतु मागील पन्नास वर्षांपासून एकीकडे जमीन ताब्यात घेणाऱ्या शेतकऱ्यांच्या १२.५ टक्केप्रमाणे मोबदला नाही मिळाला नव्हता.

**-अश्विनी जगताप, आमदार, चिंचवड विधानसभा.**



“ प्राधिकरणातील 106 भूमिपूत्रांना अखेर मिळाला न्याय राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रयत्नाला अखेर यश मिळाले आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भूमिपुत्रांच्या मागण्यासाठी सकारात्मक निर्णय घेतला. यासाठी राष्ट्रवादीच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा करण्यात आला होता. महायुती सरकार आणि अजित पवार यांचे आभार व्यक्त करतो.

**- अजित गव्हाणे, शहराध्यक्ष, राष्ट्रवादी.**

# 'बारामती'मध्ये शिवतारे अपक्ष उभे राहणार?

## » पवारांच्या जाचाला कंटाळून मतदारांना पर्याय देण्याचा दावा

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बारामती लोकसभा मतदारसंघात अजित पवार विरुद्ध शरद पवार असे चित्र रंगत असतानाच त्याला आता आणखी वेगळे वळण मिळाले आहे. महायुतीतील शिवसेनेचे पुरंदरचे माजी आमदार विजय शिवतारे यांनी या वादात उडी घेत दोन्ही पवारांच्या विरोधात दंड थोपटले आहेत. बारामती लोकसभा मतदारसंघात अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढविण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे. त्यावेळी आपण महायुतीच्या किंवा त्यांच्या विचारांच्या विरोधात नसल्याचेही स्पष्ट केले. त्यामुळे आता शिवतारेंना महायुती रोखणार की अजित पवार यांची डोकेदुखी वाढणार हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्यावतीने शरद पवार यांनी दोन दिवसांपूर्वी बारामतीमधून सुप्रिया सुळे यांची उमेदवारी जाहीर केली आहे. दुसरीकडे, सुनेत्रा पवार यांची उमेदवारी जाहीर करण्याची मागणी कार्यकर्त्यांनी अजित पवार यांच्याकडे केली आहे. त्यामुळे पवार विरुद्ध पवार असे चित्र रंगत असताना दुसरीकडे काही दिवसांपूर्वी 'लोकसभेचे नंतर, आधी आमचे पहा,' अशी तक्रार करणाऱ्या पुरंदरच्या विजय शिवतारे यांनी आता थेट दोन्ही पवारांविरोधात दंड थोपटल्याने राजकीय वर्तुळात वेगळीच चर्चा सुरू झाली आहे.

'ज्यांच्या जाचाला, दादागिरीला कंटाळून अनेक जण शिवसेना किंवा भाजपमध्ये गेले आहेत. तेच अजित पवार आता महायुतीत आल्याने त्यांना मतदान करण्यास भाजप सांगत असेल तर आम्ही कसे मतदान करायचे अशी भूमिका अनेक मतदारसंघात आहे. त्यामुळे पवार विरुद्ध पवार लढाईत आपण उतरणार होत.



### पवारांविरोधात पावणेसहा लाख मते

» 'बारामती लोकसभा मतदारसंघ हा कोणा एकाचा सातबारा नाही. पवारांविरोधात पाच लाख ८० हजार मतदान आहे. एकीकडे पवार विरुद्ध पवार अशी लढाई दाखविली जात आहे. पवारांना विरोध करणारे लोक खूप मोठ्या प्रमाणात आहेत. त्यांनी मतदान कोठे करायचे', असा सवाल शिवतारे यांनी उपस्थित केला. विधानसभेला 'कसा निवडून येतो बघतोच,' असे खुले आव्हान अजित पवार यांनी आपल्याला दिले होते. सहा सात पक्ष एकत्र करून कट कारस्थाने केली आहेत. अजित पवार अशा पद्धतीने पुरंदरच्या जनतेशी वागले आहेत. त्यामुळे पुरंदरची जनता कोणत्या परिस्थितीत मतदान करणार असा प्रश्न उपस्थित करीत नरेंद्र मोदी विचारमंचाच्या रुपाने आपण रिंगणात उतरणार आहोत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### काय म्हणाले विजय शिवतारे?

» माजी मंत्री विजय शिवतारे यांनी महिला दिनानिमित्त पुरंदर तालुक्यात 'खेळ खेळू पैठणीचा' या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी त्यांनी आगामी लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असल्याचे संकेत दिले आहेत. आपण पवार कुटुंबियांनाच का मतदान करावे? बारामती मतदार संघ कोणाचा सातबारा नाही, असे विजय शिवतारे म्हणालेत.

### लढत तिरंगी होणार?

» तसेच बारामती लोकसभा मतदारसंघात पवारांच्या विराधात तब्बल 5 लाख 80 हजार मतदार आहेत. त्यामुळे येणाऱ्या लोकसभेत आरपारची लढाई करणार आहे. तुमच्या सर्वांची साथ हवी, असे म्हणत सासवडमधील पालखीतळावर अजित पवार यांनी केलेला अपमान केवळ विजय शिवतारेंचा नसून तो पुरंदरच्या स्वाभिमानी जनतेचा केला आहे, असे विजय शिवतारे म्हणालेत. त्यामुळे बारामती लोकसभेची निवडणूक तिरंगी होणार का? हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

### अजित पवार- विजय शिवतारे कट्टर विरोधक

» दरम्यान, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि माजी मंत्री विजय शिवतारे यांचा वाद सर्वश्रुत आहे. आधी राष्ट्रवादीत असलेले विजय शिवतारे हे २०१९ च्या निवडणुकीत शिवसेनेकडे गेले होते. त्यावेळी अजित पवार यांनी थेट आव्हान देऊन शिवतारेंचा पराभव केला होता. त्यामुळेच शिवतारे अजित पवारांविरोधात दंड थोपटण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

---

# एकेकाळी देणारे होते, आज दिल्लीच्या दारात मागणारे झालेत!

## » अमोल कोल्हेंचा अजित पवार यांच्यावर बोचरा वार

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आगामी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अमोल कोल्हे चांगलेच आक्रमक झाले आहेत. शिरूर लोकसभा जिंकण्यासाठी त्यांनी विरोधक नाही तर थेट चॅलेंज देणारे अजित पवार यांना धारेवर धरलं आहे. एक दोन नाही तर अनेकवेळा अजित पवार यांच नाव न घेता कोल्हे तिखट शब्दांत प्रहार करत आहे. आजदेखील अजित पवार यांचं नाव न घेता कोल्हे यांनी टीका केली आहे. याआधी सेलिब्रेटी उमेदवार म्हणत अजित पवारांनी अमोल कोल्हेंवर टीका केली होती. याचाच बदला म्हणून कोल्हेंनी आज पुन्हा अजित पवारांना डिवचलं आहे.**

अगदीच बोटावर मोजण्याएवढ्या जागा मिळत असल्यामुळे कोल्हे म्हणाले, वाघ गर्जत होते. भाई जब अपने घर मै थे तब वाघ गर्जत होते, पण आताची परिस्थिती पाहून सर्कशीची आठवण येते.

गुजराती हंटर वाजला की जे १८ जागा सांगत होते ते ९ वर येणार, जो पक्ष ९ जागा सांगत होते ३ वर येणार, अशी परिस्थिती पाहून कुठल्याही स्वाभिमानी नेत्याला वाटलं पाहिजे, अरे कधी काळी देणारा होतो, आता आज दिल्लीच्या दारात जाऊन मागणार झालो आहे, असं म्हणत अमोल कोल्हे यांनी तिखट शब्दांत अजित पवार यांचा नाव न घेता टीका केली आहे.






### जागा वाटपासंदर्भात निशाण्यावर धरलं

» शिरूर लोकसभा निवडणुकांच्या अनुषंगाने चेतन तुपेच्या मतदारसंघात अमोल कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविकास आघाडीचा मेळावा पार पडला. या मेळाव्यासाठी राष्ट्रवादी शरदचंद्र पवारचे शहर अध्यक्ष प्रशांत जगताप, शिवसेना ठाकरे गटाचे शहर प्रमुख संजय मोरे, कॉंग्रेस शहर अध्यक्ष अरविंद शिंदे आणि अन्य घटक पक्षांचे शहर प्रमुख उपस्थित होते. या मेळावादरम्यान कोल्हे यांनी जागा वाटपासंदर्भात अजित पवारांना निशाण्यावर धरलं आहे.

---

# समाविष्ट गावातील मिळकतकर थकबाकी वसूल करण्यास राज्य शासनाची स्थगिती

।पुणे ।महाईन्यूज ।




समाविष्ट गावातील मिळकतकर थकबाकी वसुलीला राज्य शासनाने सोमवारी स्थगिती दिली. समाविष्ट गावांपैकी बहुतांश गावे शिरूर आणि बारामती लोकसभा मतदारसंघात येत असल्याने त्याचा अजित पवार यांना फायदा होण्याची शक्यता आहे.

महापालिका हद्दीत समाविष्ट झालेल्या गावांना तीनपट मिळकतकर आकारणी महापालिकेच्या कर आकारणी आणि कर संकलन विभागाकडून करण्यात आली आहे. तसेच थकबाकी वसुलीसाठी मोहीम ही हाती घेण्यात आली असून त्याविरोधात समाविष्ट गावातील नागरिकांकडून सातत्याने नाराजी व्यक्त होत होती. या पार्श्वभूमीवर गावक-यांनी गेल्या आठवड्यात उपमुख्यंत्री अजित पवार यांची भेट घेतली होती. त्यावेळी धोरणात्मक निर्णय होत नाही तोपर्यंत थकबाकी वसुली करू नये अशी सूचना पवार यांनी आयुक्त प्रशासक विक्रम कुमार यांना केली होती.

त्यानंतर रविवारी झालेल्या कार्यक्रमावेळीही पवार तसे स्पष्ट संकेत दिले होते. समाविष्ट ३४ गावातील मिळतकर शास्तीकराचा प्रश्न पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या धर्तीवर सोडविला जाईल. तोपर्यंत शास्तीकराची म्हणजे मिळकतकराच्या थकबाकीच्या दंडची आकारणी करण्यात येऊ नये, अशी सूचना महापालिकेला करण्यात आली आहे.

यासंदर्भातील शासन निर्णय लवकरच घेतला जाईल, असे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जाहीर केले होते.त्यानुसार मंत्रीमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या निर्णयचाराजकीय फायदा अजित पवार यांना होईल अशी चर्चा या निमित्ताने सुरू झाली आहे. दरम्यान या निर्णयाला ठाकरेगटाने विरोध दर्शविला असून सर्वांना समन्याय द्यावा अशी मागणी ठाकरे गटाचे शहर प्रमुख संजय मोरे यांनी केली आहे.




पिंपरी-चिंचवडच्या प्रश्नांवर एकच रामबाण उपाय

# आमदार महेशदादा लांडगे

- १ - शास्तीकर ✓
- २ - अनधिकृत बांधकाम नियमितीकरण ✓
- ३ - नदीसुधार प्रकल्प ✓
- ४ - भामा आसखेड पाणी प्रकल्प ✓
- ५ - पिंपरी-चिंचवडमधील वाहतूक समस्या ✓
- ६ - सोसायटीधारकांच्या समस्या ✓
- ७ - स्वतंत्र पोलीस आयुक्तालय ✓
- ८ - समाविष्ट गावांच्या विकासाचा 'बॅकलॉग' ✓
- ९ - कचरा प्रश्न- वेस्ट टू एनर्जी ✓
- १० - बफर झोन ✓
- ११ - उपयोगकर्ता शुल्क ✓

आणि आता....

## ५० वर्षांपासून प्रलंबित प्राधिकरण बाधित भूमिपुत्रांचा साडेबारा टक्के परतावा प्रश्न सोडवला!

महायुती सरकार आणि कर्तव्यदक्ष आमदार महेशदादा लांडगे यांचे हार्दिक अभिनंदन..!

"गेल्या ५० वर्षांपासून प्रलंबित प्राधिकरण बाधित १०६ शेतकरी कुटुंबांचा प्रश्न सोडवण्यासाठी २०१४ पासून पाठपुरावा करीत आहे. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक भूमिकेतून निर्णय घेतला होता. त्याला महायुती सरकारच्या माध्यमातून मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत झालेल्या कॅबिनेट मंत्रीमंडळाच्या बैठकीत मंजुरी मिळाली. आता हा प्रश्न कायमस्वरूपी सुटला आहे. बाधित शेतकऱ्यांना सव्वा सहा टक्के जमीन आणि २ चा 'एफएसआय' असा साडेबाराटक्के परतावा देण्यात येणार आहे. त्यासाठी महायुती सरकारचे आभार व्यक्त करतो. सुमारे ५ हजार भूमिपुत्रांशी संबंधित हा विषय कामयस्वरुपी सुटला याचे समाधान वाटते." - **महेश लांडगे** (आमदार, भोसरी विधानसभा)

Rainbow Advertising 8282827796

**समस्त आकुर्डी, निगडी, चिंचवड ग्रामस्थ.** | सौजन्य - **श्री. सोमनाथ मारूती काळभोर**



## भूमिका

# प्रकल्पांना गती देणारा खासदार हवा

**पुण्याला खासदार नाही, याला जवळपास आता एक वर्ष पूर्ण होईल. पुढील महिन्यात लोकसभेच्या निवडणुका जाहीर होतील आणि त्यानंतर यथावकाश पुण्याला खासदार मिळेलच. महापालिकेतील नगरसेवक आणि खासदार यांच्याकडून अपेक्षित कामांमध्ये मूलभूत फरक आहे, हे पुणेकरांनी आणि संभाव्य उमेदवारांनी समजून घ्यायला हवे. तरच, पुण्याचा खासदार दिल्लीत यशस्वी ठरू शकेल.**

शालेय पाठ्यपुस्तकांमध्ये नागरिकशास्त्राचा अभ्यास करताना लोकसभा, विधानसभा आणि महापालिका यांचे अधिकार आणि कर्तव्ये बहुतेक सर्व जण शिकलेले असतात. या प्रतिनिधी मंडळांमध्ये काम करणारे खासदार, आमदार आणि नगरसेवक यांच्याकडून कोणती कामे अपेक्षित असतात, हे सुद्धा आपल्याला माहिती असते. दुर्दैवाने, निवडणुकीच्या रणधुमाळीत खासदाराकडून स्थानिक स्तरावरील नगरसेवकांकडून केली जाणारी कामे आणि नगरसेवकांकडून खासदाराच्या अखत्यारित येणाऱ्या कामांची जाहिरातबाजी राजकीय पक्षांकडून केली जाते. मतदार म्हणून आपण त्यावर विश्वास ठेवतो आणि खरे तर फसतोच. खासदाराच्या विकास निधीतून आपल्या परिसरातील एखाद्या व्यायामशाळेचे (ओपन जिम) उद्घाटन, एखाद्या वाचनालयाचे नूतनीकरण, रस्त्यावर सार्वजनिक स्वच्छतागृहांचे बांधकाम अथवा बसथांबे बांधून दिले, की 'खासदार



खरेच कामाचा आहे,' अशी भावना होत असेल, तर नागरिकशास्त्राचे पुस्तक पुन्हा अभ्यासायला हवे.

कायदेमंडळ म्हणून देशासाठी एखादे धोरण निश्चित करण्यात खासदाराचा सहभाग असतोच. तो सत्ताधारी पक्षाऐवजी विरोधी पक्षात असला, तरी उपयुक्त सूचना करणे खासदाराच्या हाती असतेच. त्याचवेळी केंद्र सरकारकडून जाहीर केल्या जाणाऱ्या विविध योजनांमधून आपल्या मतदारसंघातील विकासकामांना गती देणे अथवा मतदारसंघातील केंद्रीय स्तरावरच्या प्रलंबित कामांसाठी संबंधित मंत्री किंवा मंत्रालयाच्या कामातून निधी मिळविणे, यासाठी दिल्लीत पाठपुरावा केला जाणे अपेक्षित आहे. एखाद्या योजनेसाठी राज्य सरकारची मदत लागते. अशावेळी संबंधित खासदाराने राज्य सरकारच्या माध्यमातून संबंधित योजना अथवा त्याद्वारे उपलब्ध होणारा निधी लवकर प्राप्त व्हावा, याची जबाबदारी घ्यायला हवी. देशभराच्या विविध भागांतील खासदार त्यासाठी प्रयत्न करताना दिसतात. पहिल्यांदाच निवडून जाणाऱ्या एखाद्या खासदाराला कदाचित पहिल्या दोन-तीन वर्षांत विविध योजनांसाठी निधी मिळविण्यात अथवा मंत्री-मंत्रालयातील अधिकारी यांच्याशी थेट संपर्क नसल्याने पाठपुरावा करण्यात अडचणी निश्चित येऊ शकतात. मात्र, त्याचसाठी संसद अधिवेशनाच्या कालावधीशिवाय दिल्लीत तळ ठोकून राहणे, पक्षाच्या माध्यमातून अथवा काही वरिष्ठ सहकाऱ्यांचे मार्गदर्शन घेऊन मतदारसंघातील योजनांच्या प्रगतीचा आढावा घेणे, काही अडचणी असल्यास त्या सोडविणे; अन्यथा थेट संसदेमध्येच प्रश्नोत्तरे, चर्चा या माध्यमातून आवाज उठविणे, अशा विविध माध्यमांतून मतदारसंघातील विकासकामांना गती देता येऊ शकते. या पद्धतीने काम करणाऱ्या खासदारांची संख्या काही कमी नाही. त्यासाठी फक्त राजकीय इच्छाशक्तीची गरज आहे. न. वि. गाडगीळ, इंदिरा मायदेव, ना. ग. गोरे, शंकरराव मोरे, एस. एम. जोशी, मोहन धारिया, विठ्ठलराव गाडगीळ या सर्वांनी स्वातंत्र्यानंतर सुरुवातीच्या ३५-४० वर्षांमध्ये पुण्याचे प्रतिनिधीत्त्व संसदेत केले आहे. खासदार म्हणून ओळख होण्याआधीच यातील बहुतांश नावांचा देशभरात दबदबा होता. यातील काहींनी केंद्रीय मंत्रिमंडळासह इतर महत्त्वाच्या घटनात्मक जबाबदाऱ्या सांभाळल्या. त्यानंतरच्या काळात सुरेश कलमाडी हे नावही दिल्लीतील बहुतेकांच्या परिचयाचे होते. केंद्रीय मंत्री आणि ऑलिम्पिक असोसिएशनच्या माध्यमातून दिल्लीतील वरिष्ठ पातळीवरच्या नेत्यांशी कलमाडी यांचे चांगले संबंध असल्याचा फायदा पुण्याला निश्चित झाला आहे, यात शंकाच नाही. अण्णा जोशी, विठ्ठल तुपे, प्रदीप रावत, अनिल शिरोळे आणि दिवंगत खासदार गिरीश बापट यांनी त्यांच्या काळात पुण्यासाठी विविध योजनांद्वारे निधी मिळविण्यासाठी पुढाकार घेतला आहे. त्यापैकी अण्णा जोशी आणि विठ्ठल तुपे हे विरोधी पक्षाचे खासदार असल्याने त्यांना सत्ताधारी पक्षाच्या खासदारांच्या तुलनेत विविध योजना किंवा प्रकल्पांसाठी पुढाकार घेण्यात मर्यादा होत्या.

## संपादकीय »

# पाठशिवणीचा दुर्दैवी खेळ

***गेली काही वर्षे मराठा आरक्षणाबाबत एकीकडे आंदोलनांच्या लाटा आणि दुसरीकडे, हंगामी तोडग्यांच्या वाटा; असा पाठशिवणीचा दुर्दैवी खेळ चालू आहे.***


यातून महाराष्ट्राची कायमची सुटका करण्यासाठीची राजकीय इच्छाशक्ती केवळ मुंबईत नव्हे तर राजधानी दिल्लीत असणे आवश्यक आहे. महाराष्ट्रात विविध समाजांना आणि विशेषकरून मराठा समाजाला आरक्षण देण्यावरून जी कमालीची गुंतागुंत आणि अस्वस्थता निर्माण झाली आहे; तिच्यावर मागासवर्ग आयोगाचा अहवाल हे टिकाऊ उत्तर आहे का; याची बिलकुल शाश्वती नाही. या आयोगाचा अहवाल स्वीकारून विधिमंडळाच्या विशेष अधिवेशनात मराठा समाजासाठी दहा टक्के आरक्षण देण्याचा ठराव मंजूर करण्यात येईल, असे सांगितले जाते. असे हे दुसऱ्यांदा होते आहे. मागे उच्च न्यायालयाने उचलून धरलेले आरक्षण सर्वोच्च न्यायालयाने नामंजूर केले होते. तसे पुन्हा होणारच नाही, याची आज काहीही हमी नाही. तिकडे मनोज जरांगे पाटील यांचे आंदोलन चालूच असून त्यांच्या वारंवार होणाऱ्या उपोषणांमुळे त्यांची व त्यांच्या आंदोलनाची तब्येतही घसरत चालली आहे. ती कशी सावरली जाणार, हा ही एक प्रश्न आहे.

'आदिवासींना त्यांच्या हक्काच्या नोकऱ्या मिळत नाहीत तेव्हा, त्यांच्या भागातील शाळा बंद पडतात, त्यांची आंदोलने चिरडली जातात, तेव्हा आपण कुठे असता..?' असा प्रश्न करत 'उत्तरदायित्वाच्या निश्चिततेचे ऐतिहासिक पाऊल' या विवेक पंडित यांच्या लेखाला (३ मार्च २०२४) प्रत्युत्तर देणारे टिपण..

# उत्तराखंडमध्ये 'लिव्ह इन'चं चुकलेलं उत्तर

समान नागरी कायद्याबद्दलची चर्चा सुरू असताना भाजपशासित उत्तराखंडमध्ये तो कायदा मंजूर झालादेखील. या कायद्याबद्दल देशभर उत्सुकता होती, ती राज्यघटनेत नोंदवलेली धर्मनिरपेक्षता आणि लिंगसमानता त्यामधून साध्य होऊ शकते, अशी आशा होती म्हणून. प्रत्यक्षात उत्तराखंडमध्ये नुकत्याच संमत झालेल्या कायद्यात 'लिव्ह इन रिलेशनशिप'बाबत नोंदवलेले मुद्दे मात्र चिंता करायला लावणारे आहेत. यातून महिला सबलीकरण होणार की, त्यांच्या आधीच्याच अधिकारांवर उलट गदा येणार, हा प्रश्न आहे.

या कायद्यानुसार १८ वर्षांवरील व्यक्ती 'लिव्ह इन'मध्ये राहू शकते. मात्र जोडीदारापैकी एक किंवा दोघे २१ वर्षांपेक्षा कमी वयाचे असतील तर मात्र त्यांच्या 'लिव्ह इन'मध्ये राहण्याला पालकांची संमती गरजेची असेल. विवाह कायद्याला छेद देणारी ही तरतूद आहे. लग्नासाठीचं मुलीचं वय कायद्याने १८ वर्षं आहे. लग्न करायचं असेल तर मुलीने पालकांची परवानगी घेतली नाही तरी चालेल, 'लिव्ह इन'साठी मात्र ती असायला हवी, हे अजब आहे!



लग्नाची कायदेशीर नोंदणी किती आवश्यक आहे, याबद्दल देशात अद्यापही सजगता नाही. विवाह होतात, मात्र त्यापैकी मोठ्या संख्येने नोंदवले मात्र जात नाहीत. त्यातून अनेक सामाजिक, कायदेशीर प्रश्न निर्माण होतात. विवाह न नोंदवणाऱ्यांना कायद्याचा कसलाही दट्ट्या नाही. पण 'लिव्ह इन'मध्ये मात्र ते निबंधकाकडे जाऊन नोंदवावे लागेल. महिन्यापेक्षा अधिक काळ नोंदणी न करता एकत्र राहिलात तर चक्क तुरुंगवासाची शिक्षा! नोंदणी प्रमाणपत्र नसताना जोडपं 'लिव्ह इन'मध्ये राहात असेल तर तीन महिने तुरुंगवास आणि १० हजार रुपये दंडाची शिक्षा आहे. नोंदणी करताना निबंधकाला कोणत्याही स्वरूपाची खोटी माहिती दिल्यास तीन महिने कारावास आणि २५ हजार रुपये दंड... ही नोंदणी प्रक्रियादेखील परीक्षा बघणारी आहे. 'लिव्ह इन'मध्ये राहण्याचा निर्णय घेतला की निबंधकाकडे अर्ज द्यायचा. तो या दोघांसांदर्भात ३० दिवसांत चौकशी करणार. ती कदाचित दोघांचं कामाचं ठिकाण, नातेवाई, मित्रमंडळी, शेजारी अशी कुठेही असू शकेल. अधिकाऱ्यांना या नात्याबाबत संपूर्ण समाधान झाले तरच प्रमाणपत्र मिळेल, नाही झालं तर 'लिव्ह इन'साठी परवानगी नाकारली जाईल. जोडप्यालाच काही काळानं हे नातं संपवायचं असेल तर पुन्हा अर्ज! 'लिव्ह इन' संदर्भातील तरतुदींसाठी पालकांचीच मागणी होती, असं कारण सरकारकडून सांगितलं गेलं. 'लिव्ह इन'मध्ये राहणाऱ्या महिलांविरोधात गुन्हे वाढल्याचं कारण यासाठी सांगितलं गेलं. प्रश्न असा उभा राहतो की, विवाहित महिलांसंबंधात सगळं आलबेल सुरू आहे का? हुंडा, घरगुती हिंसाचार, विवाहांतर्गत लैंगिक छळ हे सगळं सुरू आहेच. 'लिव्ह इन'ची केवळ नोंदणी करून हे प्रश्न कसे सोडवणार? आणि 'लिव्ह इन' मध्ये राहणाऱ्या महिलांना २००५ च्या घरगुती हिंसाचारविरोधी कायद्याखाली संरक्षण दिलेले आहेच की.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# महायुतीत वादाची ठिणगी?

## » मिटकरी एकनाथ शिंदेंना म्हणाले, "शिवतारेंना आवरा, अन्यथा..."!

| मुंबई | महाईन्यूज |
प्रतिनिधी|

**विजय शिवतारे आणि अजित पवार हे दोन्ही नेते महायुतीत एकत्र असले तरी दोघांनी एकमेकांविरोधात दंड थोपटले आहेत. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीतील पराभवाचा बदला घेण्यासाठी विजय शिवतारे यांनी मतदारसंघात जोरदार मोर्चेबांधणी केली आहे.**



बारामती लोकसभा मतदारसंघ हा कुणाचा सातबारा नाही, ५० वर्षे आम्ही तुम्हाला निवडून देतो आहे. 'तू कसा निवडून येतोस तेच पाहतो', असे म्हणणाऱ्या अजित पवारांचा बदला घेण्याची वेळ आली आहे, अशा शब्दात माजी मंत्री आणि शिवसेनेच्या शिंदे गटातील नेते विजय शिवतारे यांनी अजित पवारांविरोधात दंड थोपटले आहेत. अपक्ष उमेदवार बनून बारामती लोकसभा लढवण्यासंदर्भात शिवतारे यांनी सोमवारी (११ मार्च) घोषणा केली.'शिवतारे कसे निवडून येतात तेच पाहतो' असे म्हणत अजित पवार यांनी गेल्या विधानसभा निवडणुकीत (२०१९) शिवतारेंना पराभवाची धूळ चारली होती.

विजय शिवतारे आणि अजित पवारांमधील संघर्ष जगजाहीर आहे. आता हे दोन्ही नेते महायुतीत एकत्र असले तरी दोघांनी एकमेकांविरोधात दंड थोपटले आहेत. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीतील पराभवाचा बदला घेण्यासाठी विजय शिवतारे यांनी बारामती लोकसभा मतदारसंघात जोरदार मोर्चेबांधणी केली आहे. अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार या मतदारसंघातून लोकसभा लढवणार असल्याची जोरदार चर्चा आहे. त्यामुळे शिवतारे बारामतीत अजित पवारांना पराभूत करून २०१९ चा बदला घेण्याच्या विचारात आहेत. दरम्यान, पवार कुटुंबाला आव्हान देत शिवतारे म्हणाले, पुरंदरच्या स्वाभिमानी जनतेसाठी मी मोठमोठ्या नेत्यांशी पंगा घेतला आहे. लोकसभेची निवडणूक समोर आहे. सुप्रिया सुळे आणि सुनेत्राताई... हेच सगळीकडे चाललंय ना... अरे बारामती हा देशातला एक लोकसभा मतदारसंघ आहे. हा काही कोणाचा सातबारा नाही. ५० वर्षे बारामतीचा खासदार पाहिजे, अशी काहींची भूमिका आहे. परंतु, पुरंदर, इंदापूर भोरचा का नको? का म्हणून आम्ही यांना मतदान करायचं पाच-पाच वेळा, दहा-दहा वेळा यांना निवडून द्यायचं... काय मिळालं आम्हाला...?

विजय शिवतारे म्हणाले, गेल्या निवडणुकीत त्यांना (सुप्रिया सुळे) ६ लाख ८६ हजार मतं मिळाली होती आणि ५ लाख ८० हजार मतं पवार कुटुंबाच्या विरोधात होती. त्या सहा लाखांमध्ये (५.८०) दोन पवार आणि पाच लाखांमध्ये एकटा विजय शिवतारे असेल. पुरंदर, भोर, इंदापूर आपल्या बाजूने असेल. ही लढाई आता आरपारची आहे आणि मी लढायचा निर्णय घेतला आहे.

विजय शिवतारे यांच्या वक्तव्यानंतर अजित पवार गटाने त्यांना प्रत्युत्तर दिलं आहे. तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना शिवतारेंना आवर घालण्याची विनंती केली आहे. अजित पवार गटाचे प्रवक्ते आणि विधान परिषदेतील आमदार अमोल मिटकरी यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा उल्लेख करत शिंदेंकडे विनंती केली आहे की, विजय शिवतारेंना आवरा. त्यांनी बोलण्यात हलकटपणाचा कळस केला आहे. शिवतारे महायुतीत राहुन अजित पवारांविरुद्ध बोलण्याचा उन्मत्तपणा करत असतील तर आमचाही नाईलाज होईल.

### अमोल मिटकरींचा इशारा

» याला उत्तर देताना आमदार अमोल मिटकरी यांनी म्हटले की, 'मुख्यमंत्री एकनाथ शिंदेसाहेब तुम्ही विजय शिवतारेंना आवरा. त्यांनी बोलण्यात हलकटपणाचा कळस केला आहे. महायुतीसोबत राहून जर दादांविरुद्ध बोलण्याचा उन्मत्तपणा ते करत असतील तर आमचाही नाईलाज होईल.'

### मी लोकसभा निवडणूक लढवणार - शिवतारे

» महिला दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या एका कार्यक्रमात बोलताना शिवतारे यांनी म्हटले की, 'सुप्रिया सुळे आणि सुनेत्रा पवार यांच्या विरोधात मी बारामती लोकसभा निवडणूक लढणार आहे. 5 लाख 80 हजार मतदार पवार कुटुंबियांच्या विरोधात आहेत, त्यांच्यासाठी मी पर्याय आहे. अजित पवारांच्या प्रवृत्ती विरोधात आणि सुप्रिया सुळेंनी पंधरा वर्षे काहीच काम केलं नाही, म्हणून मी निवडणुकीच्या रिंगणात उभा असेन.'पुढे बोलताना शिवतारे यांनी म्हटले की, 'लोकसभेची निवडणूक समोर आहे. सुप्रिया ताई, सुनेत्रा ताई असं सुरू आहे. मात्र बारामती लोकसभा हा कोणाचा सातबारा नाही. बारामती मतदारसंघात पुरंदर, भोरचाही खासदार पाहिजे. याच ठिकाणी अजित पवार यांनी विजय शिवतारेंचा अपमान केला होता. आता त्याचा बदला घेण्याची वेळ आली आहे.'

---

# मुंबईच्या सौंदर्यात भर घालणारा ठरेल कोस्टल रोड प्रकल्प

## » पहिल्यांदाच होतोय या अत्याधुनिक यंत्रणेचा वापर

| मुंबई | महाईन्यूज |
प्रतिनिधी|

**मुंबई कोस्टल रोड प्रकल्प म्हणजेच धर्मवीर स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज कोस्टल रोड प्रकल्पाच्या एका मार्गिकेचे उद्घाटन आज करण्यात आले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी हिरवा झेंडा दाखवत उद्घाटन केले.**



प्रकल्पाचा वरळी ते मरीन ड्राइव्ह हा पहिला टप्पा वाहतूकीसाठी खुला करण्यात आला. मुंबईकरांच्या वेळेची तसेच इंधनाची बचत व्हावी म्हणून नरिमन पॉईंटपासून दहिसर-विरार अश्या मुंबई कोस्टल रोड प्रकल्पाचे काम महानगरपालिकेने हाती घेतले. कोस्टल रोड प्रकल्पातील पहिला टप्पा म्हणजे प्रिन्सेस स्ट्रीट उड्डाणपूल ते वरळी पर्यंतच्या मार्गाचे आज उद्घाटन करण्यात आले. 12 मार्चपासून कोस्टल रोड मुंबईकरांसाठी खुला होणार आहे. कोस्टल रोडमुळे मरीन ड्राइव्ह ते वरळी प्रवास 10 मिनिटांत पूर्ण होणार असून यासाठी एकूण 14 हजार कोटी रुपयांचा खर्च करण्यात आला आहे.

कोस्टल रोड प्रकल्प हा मुंबई महापालिकेचा एक महत्वकांशी प्रकल्प आहे. 12 मार्चपासून सोमवार ते शुक्रवार असा पाच दिवस सकाळी 8 ते रात्री 8 या वेळेत हा मार्ग वाहतूकीसाठी सुरु असेल. या मार्गामुळे 34 टक्के इंधनाची तर 70 टक्के वेळेची बचत होईल. या मार्गावर 2.07 किमीचे एकूण दोन जुळे बोगदे आहेत.

### वेळेची बचत

» कोस्टल रोडची मरीन ड्राईव्ह ते वरळी 9.5 किमीची ही मार्गिका मंगळवारपासून वाहतुकीसाठी खुली करण्यात येणार आहे. सकाळी 8 ते रात्री 8 या वेळेत सोमवार ते शुक्रवार असा पाच दिवस या मार्गावरुन वाहनचालकांना प्रवास करता येणार आहे. इतर प्रकल्पाची कामे सध्या सुरु आहेत. ही काम सुरळीत सुरु राहण्यासाठी वाहतुकीच्या वेळा ठरवण्यात आल्या आहेत. तसेच शनिवार व रविवारी वाहतूक बंद असणार आहे. या प्रकल्पामुळे वाहतूक कोंडीतून प्रवाशांची सुटका होणार आहे. यामुळे 70 टक्के वेळेची व 34 टक्के इंधनाची बचत होईल. तसेच प्रदुषणातही घट होईल असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

# काँग्रेसची पुढील यादी एकदोन दिवसांत?

## काँग्रेसचे केरळ, तेलंगणा, छत्तीसगढ व ईशान्येकडील राज्यांतील 39 उमेदवार जाहीर

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**भाजपप्रमाणे काँग्रेसच्या केंद्रीय निवडणूक समितीची बैठक सोमवारी झाली असून गुजरात, राजस्थान, उत्तराखंड, आसाम, मध्य प्रदेश या राज्यांतील संभाव्य उमेदवार निश्चित करण्यात आले असल्याचे समजते. पुढील एखाद-दोन दिवसांमध्ये काँग्रेसची दुसरी याही जाहीर होण्याची शक्यता आहे.**

या बैठकीमध्ये उत्तरप्रदेशची चर्चा झाली नसल्याने अमेठीमधून राहुल गांधी व रायबरेलीतून प्रियंका गांधी-वाड्रा निवडणूक लढवणार की नाही, याबाबत संदिग्धता अजूनही कायम आहे. काँग्रेसच्या पहिल्या यादीमध्ये केरळमधील वायनाड मतदारसंघातून राहुल गांधी यांची उमेदवारी घोषित करण्यात आली आहे. गेल्या आठवड्यात काँग्रेसचे केरळ, तेलंगणा, छत्तीसगढ व ईशान्येकडील राज्यांतील ३९ उमेदवार जाहीर केले होते.

केंद्रीय निवडणूक समितीच्या बैठकीत राजस्थानमधील १३ जागांवरील उमेदवारांसंदर्भात चर्चा झाली असून ९-१० जागांवर सहमती झाल्याचे समजते. मध्य प्रदेशमधील ७० टक्के जागांवरील उमेदवार निश्चित करण्यात आल्याचे प्रदेशाध्यक्ष जितू पटवारी यांनी सांगितले.



### राहुल गांधी गैरहजर

समितीच्या दुसऱ्या बैठकीलाही राहुल गांधी गैरहजर होते. राहुल गांधी भारत जोडो न्याय यात्रेमध्ये व्यग्र असले तरी, समितीच्या बैठकीसाठी सोमवारी ते दिल्लीला येणार असल्याचे सांगितले जात होते. मुख्यालयात झालेल्या बैठकीला पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, सोनिय गांधी, के. सी वेणुगोपाल यांच्यासह अन्य नेते उपस्थित होते.

### महाराष्ट्राची चर्चा पुढील टप्प्यामध्ये

» महाविकास आघाडीतील शिवसेना (ठाकरे गट), काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) या तीनही घटक पक्षांमध्ये जागावाटपाची चर्चा अंतिम टप्प्यामध्ये आली आहे. मात्र बहुजन वंचित आघाडीच्या समावेशाबाबत संदिग्धता कायम आहे. महाविकास आघाडीमध्ये जागावाटपावर शिक्कामोर्तब झाल्याशिवाय केंद्रीय स्तरावर काँग्रेसचे उमेदवार निश्चित करता येत नसल्यामुळे महाराष्ट्राची चर्चा लांबणीवर पडली आहे.

### निवडणुकीच्या तोंडावर केंद्राची अधिसूचना

» नवी दिल्ली : संसदेने मंजुरी दिल्यानंतर तब्बल पाच वर्षांनी वादग्रस्त नागरिकत्व दुरुस्ती कायदा (सीएए) केंद्र सरकारने सोमवारी लागू केला. त्यासंदर्भातील अधिसूचना काढण्यात आली असून लोकसभा निवडणुकीसाठी महिनाभराचा कालावधी उरला असताना केंद्राने हा अत्यंत संवेदनशील निर्णय घेतला आहे. डिसेंबर २०१९ मध्ये 'सीएए'विरोधात देशभर हिंसक आंदोलने झाली होती. भाजपने २०१९च्या लोकसभा निवडणूक जाहीरनाम्यात 'सीएए'चे आश्वासन दिले होते.

» पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत सोमवारी झालेल्या भाजपच्या केंद्रीय निवडणूक समितीच्या बैठकीत महाराष्ट्रासह सात-आठ राज्यांतील उमेदवारांच्या निवडीवर चर्चा करण्यात आली असून सुमारे १५० उमेदवारांची दुसरी यादी मंगळवारी वा बुधवारी जाहीर होण्याची शक्यता आहे. भाजपच्या मुख्यालयामध्ये रात्री उशिरापर्यंत चाललेल्या बैठकीत राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्यासह इतर समिती सदस्य उपस्थित होते.

महाराष्ट्र, कर्नाटक, मध्य प्रदेश, राजस्थान, आंध्र प्रदेश, ओडिशा, हरियाणा, उत्तराखंड या राज्यांमधील उमेदवारांसंदर्भात चर्चा करण्यात आल्याचे समजते. महाराष्ट्रातील महायुतीतील जागावाटपाचा तिढा अजून सुटलेला नसला तरी भाजप लढवत असलेल्या बहुसंख्य जागांवरील उमेदवारांवर अंतिम मोहोर उमटवण्यात आल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, पीयुष गोयल आदी मोदी सरकारमधील वरिष्ठ मंत्र्यांच्या उमेदवारीचीही घोषणा दुसऱ्या यादीमध्ये केली जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. याशिवाय, बीडमधून प्रीतम मुंडे यांच्याऐवजी पंकजा मुंडेंचा विचार केला जाऊ शकतो. संभाजीनगर मतदारसंघाचा आग्रह भाजपने सोडला तर केंद्रीय राज्यमंत्री भागवत कराड यांना संधी हुकण्याची शक्यता असेल. पुण्यातून मुरलीधर मोहोळे यांच्या नावाची चर्चा आधीपासून होत आहे. सांगलीमधून संजयकाका पाटील यांना पुन्हा उमेदवारी दिली जाऊ शकते.राज्यसभेतील काही मंत्र्यांना लोकसभेच्या निवडणुकीत उतरवले जाणार असल्याचे सांगितले जात होते. मनसुख मंडाविया, राजीव चंद्रशेखर, पुरुषोत्तम रुपाला आदी काही मंत्र्यांना लोकसभेची उमेदवारी आधीच जाहीर झालेली आहे. त्यामुळे दुसऱ्या यादीत केंद्रीयमंत्री निर्मला सीतारामन, एस. जयशंकर आदी मंत्र्यांचाही समावेश होण्याबाबत उत्सुकता असेल. भाजपच्या मुख्यालयामध्ये शनिवारी गुजरात, मध्य प्रदेश, बिहार, तेलंगणा या राज्यांतील वरिष्ठ नेत्यांशी पक्षाध्यक्ष जे. पी. नड्डा व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची उमेदवारांच्या निवडीसंदर्भात चर्चा झाली होती. पहिल्या यादीमध्ये बिहार वगळता अन्य राज्यांच्या काही उमेदवारांची घोषणा करण्यात आली होती.

---

# "धर्मयुद्धात श्रीकृष्ण आमच्या बाजूने"!

## केजरीवालांनी हरियाणात फोडला प्रचाराचा नारळ; कुरुक्षेत्रमधून उमेदवाराची घोषणा

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**कुरुक्षेत्र मतदारसंघातील उमेदवाराच्या प्रचारासाठी अरविंद केजरीवाल यांच्या आम आदमी पार्टीने 'बदलेंगे कुरुक्षेत्र, बदलेंगे हरियाणा. इब्बकै INDIA को जिताना' असं घोषवाक्य जाहीर केलं आहे.**

आगामी लोकसभा निवडणुकीसाठी विविध पक्षांनी मोर्चेबांधणी सुरू केली आहे. तसेच प्रचारालाही सुरुवात केली आहे. आम आदमी पार्टीचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांनी दिल्लीपाठोपाठ हरियाणातही त्यांच्या पक्षाच्या प्रचाराचा नारळ फोडला. केजरीवाल यांनी हरियाणाच्या कुरूक्षेत्र येथून प्रचारमोहीमेला सुरुवात केली आहे. आम आदमी पार्टीला इंडिया आघाडीत हरियाणामधील लोकसभेच्या एकूण १० पैकी कुरुक्षेत्र लोकसभेची एक जागा मिळाली आहे. केजरीवाल यांनी या जागेवर आपचे माजी राज्यसभा खासदार सुशील कुमार गुप्ता यांना तिकीट दिलं आहे. दरम्यान, केजरीवाल यांनी १० मार्च रोजी हरियाणात लोकसभेच्या प्रचाराचा नारळ फोडला. यावेळी मंचावर पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान उपस्थित होते.

कुरुक्षेत्र लोकसभा मतदारसंघासाठी अरविंद केजरीवाल यांच्या पक्षाने 'बदलेंगे कुरुक्षेत्र, बदलेंगे हरियाणा. इब्बकै INDIA को जिताना' (कुरुक्षेत्र बदलूया, हरियाणा बदलूया, यावेळी इंडियाला जिंकवूया), असं घोषवाक्य जाहीर केलं आहे. याच घोषवाक्यासह आप कार्यकर्ते कुरुक्षेत्रमध्ये त्यांच्या उमेदवाराचा म्हणजेच सुशीलकुमार गुप्ता यांचा प्रचार करतील. आपने कुरुक्षेत्रमध्ये आयोजित केलेल्या जाहीर सभेत अरविंद केजरीवाल उपस्थितांना उद्देशून म्हणाले, मतदारांनो यावेळी चूक करू नका, आपल्याला अमूक एका व्यक्तीला पंतप्रधान बनवायचं आहे, तमुक व्यक्तीला त्या खुर्चीवर बसवायचं आहे याच्या फंदात तुम्ही पडू नका. तुमच्या खासदारावर तुमचं लक्ष असलं पाहिजे. तुम्ही खासदार निवडा, त्यानंतर ते पंतप्रधान निवडतील. तुम्ही तुमच्या माणसाला संसदेत पाठवा. भाजपाच्या नादाला लागू नका.



### अधर्माच्या बाजूने उभं राहायचं की, धर्माच्या?

» अरविंद केजरीवाल यावेळी हरियाणाचे मुख्यमंत्री मनोहरलाल खट्टर यांच्यावर निशाणा साधत म्हणाले, गेल्या १० वर्षांमध्ये खट्टर यांनी हरियाणाची वाट लावली आहे. इथले लहान-थोर खट्टर सरकारला वैतागले आहेत. हरियाणातील जनतेला खट्टर यांचं सरकार पुन्हा नको आहे. कुरुक्षेत्र ही एक ऐतिहासिक भूमी आहे. याच भूमीवर धर्मयुद्ध झालं होतं. आता पुन्हा एकदा धर्म आणि अधर्मामध्ये संघर्ष चालू झाला आहे. त्यावेळी पांडवांकडे भगवान श्रीकृष्ण होते, आज तेच कृष्ण आमच्याबरोबर आहेत. त्यांच्याकडे सर्व प्रकारची ताकद आहे. त्यांच्याकडे सीबीआय, ईडी, आयटीची ताकद आहे. परंतु, आपण अधर्माच्या बाजूने उभं राहायचं की, धर्माच्या? याचा निर्णय तुम्ही घ्यायचा आहे.

# 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' फेम गौरव मोरे पोहोचला गोव्यात!




हास्यजत्रेमुळे गौरवसारखे अनेक नवोदित कलाकार प्रकाशझोतात आले. महाराष्ट्राला खळखळून हसवणारा हा विनोदवीर सध्या कामानिमित्त गोव्यात पोहोचला आहे

गौरव मोरे गेले काही दिवस चित्रपटाच्या शूटिंगनिमित्त कोकण दौऱ्यावर होता. परंतु, आता हा प्रेक्षकांचा लाडका विनोदवीर गोव्यात पोहोचला आहे. अभिनेत्याने गोव्यातील एका किल्ल्यावरून खास व्हिडीओ शेअर करत सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. गौरव मोरेने त्याच्या दोन मित्रांसह गोव्यातील एका किल्ल्यावर आमिर खानच्या 'दिल चाहता है' चित्रपटातील आयकॉनिक सीन रिक्रिएट केला आहे. २००१ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'दिल चाहता है'मध्ये आमिरसह सैफ अली खान आणि अक्षय खन्ना यांनी प्रमुख भूमिका साकारल्या होत्या. या चित्रपटातील गोव्यातील चापोरा फोर्टवरचा आयकॉनिक सीन प्रेक्षकांच्या आजही लक्षात आहे.

# स्पृहा जोशीची नवीन मालिका लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस

सध्या नवनवीन मालिका प्रेक्षकांच्या भेटीस येण्याच सत्र सुरू आहे, असं म्हणायला काही हरकत नाही. गेल्या काही महिन्यांपासून जुन्या मालिका प्रेक्षकांचा निरोप घेऊन नवीन मालिका येत आहेत. मग 'झी मराठी' वाहिनी असो किंवा 'स्टार प्रवाह' प्रत्येक मराठी वाहिनी नवीन मालिका प्रेक्षकांच्या मनोरंजनसाठी घेऊन येत आहेत. काही दिवसांपूर्वी 'कलर्स मराठी'ने 'इंद्रायणी' या मालिकेची घोषणा केली होती. त्यानंतर आता आणखी एका नव्या मालिकेची घोषणा 'कलर्स मराठी'ने केली आहे. या मालिकेत सिनेसृष्टीतील आघाडीची अभिनेत्री स्पृहा जोशी पाहायला मिळणार आहे.

'कलर्स मराठी'ने नुकतंच सोशल मीडियावर नव्या मालिकेचा प्रोमो प्रदर्शित केला आहे. या नवीन मालिकेचं नाव 'सुख कळले' असं आहे. या मालिकेत अभिनेत्री स्पृहा जोशीसह अभिनेता सागर देशमुख झळकणार आहे. याशिवाय स्पृहा व सागरबरोबर मिमी खडसे ही बालकलाकार देखील पाहायला मिळणार आहे.

स्पृहा व सागर यांची प्रमुख भूमिका असलेली 'सुख कळले' ही नवीन मालिका कधीपासून सुरू होणार?




हे गुलदस्त्यात ठेवण्यात आलं आहे. पण मालिकेचा सुंदर प्रोमो पाहून कलाकार मंडळींसह स्पृहाच्या चाहत्यांना सुखद धक्का बसला आहे. या प्रोमोवर इतर कलाकार मंडळी शुभेच्छा देत असून चाहत्यांनी उत्साही असल्याची प्रतिक्रिया दिली आहे.

# मधूरा वेलणकरने केलं सासऱ्यांचं कौतूक!



अभिनेत्री मधुरा वेलणकर ही मराठी सिनेसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेत्री आहे. मधुराने मराठीसोबतच हिंदी सिनेसृष्टीही गाजवली आहे. आतापर्यंत अनेक मालिकांमध्ये मधूराने आपल्या अभिनयाचं कौशल्य दाखवलं आहे. मात्र मधुरा वेलणकर आता पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर पुनरागमन करत आहे. लवकरच अभिनेत्रीचा अलीबाबा आणि चाळीशीतले चोर हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. जितकी अभिनेत्री तिच्या पर्सनल लाईफमुळे चर्चेत असते तितकीच तिचं प्रोफेशनल लाईफही चर्चेत असतं. मात्र अभिनेत्रीने तिच्या पर्सनल आयुष्याविषयी मोठा खुलासा केला आहे. ज्येष्ठ अभिनेते शिवाजी साटम यांची मधूरा सून आहे.

सीआयडी मधील कुछ तो गडबड है दया. हा डायलॉग तुम्हाला आठवतच असेल. तर हा डायलॉग जितका प्रसिद्ध होता तितकाच सीआयडीमधील सगळेच कलाकारही खूप प्रसिद्ध होते. १९९८ साली सुरू झालेलं 'सीआयडी' (CID) कार्यक्रम तुफान गाजला होता. या कार्यक्रमातील प्रत्येक पात्रही खूप हिट झालं. इतकंच नव्हेतर यातले अनेक डायलॉगही प्रेक्षकांनी डोक्यावर घेतले. मात्र शिवाजी साटम यांच पात्र खूपच गाजलं. प्रत्येक घरात हा कार्यक्रम पाहायला जायचा. शिवाजी साटम यांचां चाहतावर्ग खूप मोठा आहे. नुकतंच त्यांची सून मधूरा वेलणकर हिने देखील त्यांचं

# रणदीप हुड्डा यांच्या 'स्वातंत्र्यवीर सावरकर'चा मराठी ट्रेलर प्रदर्शित!




स्वातंत्र्य लढ्यातील सेनानी... महान क्रांतिकारक... समाजसुधारक... राजनेता... साहित्यिक... म्हणजेच स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर. एक विलक्षण व्यक्तिमत्व. सावरकर हे प्रखर राष्ट्रभक्त असल्याने त्यांच्या मनात स्वातंत्र्याबद्दलचा जाज्वल्य विश्वास होता. त्यांनी अस्पृश्यता निर्मूलन, सामाजिक सुधारणांचा पुरस्कार केला. देशाच्या स्वातंत्र्यासाठी, राष्ट्र उन्नतीसाठी स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे महत्वपूर्ण योगदान आहे. त्याचे हे अमूल्य योगदान प्रेक्षकांना पडद्यावर अनुभवायला मिळणार आहे.

नुकताच 'स्वातंत्र्यवीर सावरकर' या मराठी चित्रपटाचा ट्रेलर लॉंच सोहळा ज्या ठिकाणी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचे महाविद्यालयीन शिक्षण झाले, त्याच पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयात संपन्न झाला. यावेळी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची भूमिका साकारणारे रणदीप हुड्डा यांच्यासह चित्रपटाची टीम उपस्थित होती.

आनंद पंडित मोशन पिक्चर्स, लिजण्ड स्टुडिओज, अवाक फिल्म्स आणि रणदीप हुड्डा फिल्म्स प्रस्तुत हा चित्रपट झी स्टुडिओजच्या सहकार्याने प्रदर्शित होणार आहे. रणदीप हुड्डा दिग्दर्शित या चित्रपटाचे झी स्टुडिओज, आनंद पंडित, संदीप सिंग, योगेश राहार आणि रणदीप हुड्डा निर्माते असून रूपा पंडित, सॅम खान, अन्वर अली, पांचाली चक्रवर्ती सहनिर्माते आहेत. तर या चित्रपटची कथा, पटकथा आणि संवाद उत्कर्ष नैथानी आणि रणदीप हुड्डा यांनी लिहिले आहेत. या चित्रपटात अंकिता लोखंडे यांनी सावरकर यांच्या पत्नीची भूमिका साकारली आहे.

# शिल्पा शेट्टीच्या लावणीने जिंकली उपस्थितांची मने











# फ्रेंच खुली बॅडमिंटन स्पर्धा:

# सात्त्विक-चिरागला विजेतेपद!

## पुरुष दुहेरीच्या अंतिम सामन्यात चायनीज तैपेइच्या ली-यांग जोडीवर मात

पॅरिस ।। वृत्तसंस्था

**भारताच्या सात्त्विकसाईराज रंकीरेड्डी-चिराग शेट्टी जोडीने बॅडमिंटनच्या पुरुष दुहेरीतील आपली मक्तेदारी कायम राखत फ्रेंच खुल्या बॅडमिंटन स्पर्धेचे (सुपर ७५० दर्जा) विजेतेपद मिळवले. अंतिम लढतीत रविवारी सात्त्विक-चिरागने चायनीज तैपेइच्या हे हुएई ली-पो सुआन यांग जोडीचे आव्हान अवघ्या ३७ मिनिटांत २१-११, २१-१७ असे सहज परतवून लावले.**



यंदाच्या हंगामात सात्त्विक-चिरागने सलग तिसऱ्या स्पर्धेत अंतिम फेरी गाठली होती. मात्र, आधीच्या दोन स्पर्धेत त्यांना उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले होते. या वेळी त्यांनी हे अपयश पुसून काढले. फ्रेंच स्पर्धेतील भारतीय जोडीचे हे दुसरे विजेतेपद ठरले. यापूर्वी २०२२ मध्ये त्यांनी ही स्पर्धा जिंकली होती.

अंतिम लढतीत सात्त्विक-चिराग यांनी अपेक्षित वर्चस्व राखले होते. लढतीमधील अखेरच्या १० गुणांपैकी ८ गुण भारतीय जोडीने पटकावून चायनीज तैपेइच्या प्रतिस्पर्धी जोडीस निष्प्रभ केले. पहिल्या गेमला दोन्ही जोडयांनी सावध सुरुवात केली होती. मात्र ४-४ अशी बरोबरीवर सलग पाच गुण मिळतवत सात्त्विक-चिरागने ९-४ अशी आघाडी घेतली आणि त्यानंतर मागे वळून बघितलेच नाही. गेमच्या मध्याला भारतीय जोडी ११-६ अशी आघाडीवर होती. ही आघाडी सातत्याने वाढवत नेत भारतीय जोडीने पहिला गेम सहज जिंकला. दुसऱ्या गेममध्ये काहीशी चढाओढ दिसली. पण, चायनीज तैपेइची ली आणि यांग जोडी भारताच्या सात्त्विक-चिराग जोडीच्या आव्हानाचा सामना करू शकली नाही. सात्त्विक-चिरागने १४-१४ अशा बरोबरीनंतर सातत्याने गुणांची कमाई करताना प्रतिस्पर्धी जोडीला पुढे केवळ तीनच गुण देत विजयावर शिक्कामोर्तब केले.

### विनेशला 50 किलो गटातून ऑलिम्पिक पात्रतेची संधी



भारताची आघाडीची कुस्तीगीर विनेश फोगटचे ऑलिम्पिक खेळण्याचे स्वप्न सोमवारी कायम राहिले. पटियाला येथे पार पडलेल्या निवड चाचणीत विनेशने ५० किलो वजनी गटातून विजेतेपद मिळवून जागतिक ऑलिम्पिक पात्रता फेरीसाठी पात्रता सिद्ध केली. संयुक्त जागतिक कुस्ती महासंघाच्या (यूडब्ल्यूडब्ल्यू) नियमाला बगल देत एकाच दिवशी ५० व ५३ किलो वजनी गटातून दिलेली चाचणी, तसेच ५३ किलो गटासाठीही ऑलिम्पिक संधी मिळवण्यासाठी मागितलेली लेखी हमी यामुळे कुस्ती निवड चाचणीच्या दुसऱ्या दिवशी विनेशचीच चर्चा रंगली होती. विनेशच्या नियोजित ५३ किलो वजनी गटातून यापूर्वीच अंतिम पंघलने ऑलिम्पिक पात्रता निश्चित केली आहे. त्यामुळे विनेशने ऑलिम्पिकसाठी ५० किलो वजनी गटातून खेळण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, ऑलिम्पिक संघ निवडीसाठी स्वतंत्र चाचणीत संधी मिळण्याची लेखी हमी विनेशने मागितल्यामुळे जवळपास अडीच तासाहून अधिक काळ ५० आणि ५३ किलो या दोन्ही वजनी गटातील निवड चाचणी सुरू होऊ शकली नव्हती.

# दीप्ती शर्माची ६० चेंडूत ८८ धावांची झुंज अपयशी

## गुजरात जायंट्स 8 धावांनी विजयी

। नवी दिल्ली ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**जिंकण्यासाठी १५३ धावांचं आव्हान मिळालेल्या युपी वॉरियर्झ संघाची अवस्था ३५/५ अशी झाली होती. दीप्ती शर्मा आणि पूनम खेमनार यांनी सहाव्या विकेटसाठी ७८ चेंडूत नाबाद १०९ धावांची भागीदारी करत संघाच्या विजयाच्या आशा पल्लवित केल्या. शेवटच्या षटकात युपी संघाला ६ चेंडूत २६ धावांची आवश्यकता होती. दीप्तीने दोन षटकार लगावत पुरेपूर प्रयत्न केले पण विजयासाठी ते पुरेसे ठरले नाहीत. दिप्तीने ६० चेंडूत ९ चौकार आणि ४ षटकारांसह नाबाद ८८ धावांची दिमाखदार खेळी साकारली तर पूनमने ३६ चेंडूत ३६ धावा केल्या.**




मेघना सिंगच्या पहिला चेंडू वाईड देण्यात आला. यामुळे युपी संघाला अतिरिक्त चेंडू मिळाला. पुढच्याच चेंडूवर दीप्तीने जोरदार षटकार लगावला. पुढच्या चेंडूवर दीप्तीने एक धाव घेतली. खेमनारने एक धाव घेतली आणि युपीच्या विजयाच्या आशा मावळल्या.

दीप्तीने स्ट्राईक मिळताच षटकार खेचला. पाचव्या चेंडूवर दिप्तीने एक धाव घेतली. शेवटच्या चेंडूवर खेमनारने एक धाव घेतली आणि गुजरातच्या खेळाडूंनी विजय साजरा केला.

पहिल्या षटकात ॲलिसा हिलीला शबनमने तंबूत परतावलं. तिने ४ धावा केल्या. त्याच षटकात चामरी अट्टापट्टूही माघारी परतली. पुढच्याच षटकात किरण नवगिरे ब्रायसच्या गोलंदाजीवर कश्यपच्या हाती झेल देऊन परतली. तिला भोपळाही फोडता आला नाही.

ग्रेस हॅरिसला ॲशले गार्डनरने बाद केलं. श्वेता सेहरावतला शबनमने त्रिफळाचीत केलं आणि युपीची अवस्था ३५/५ अशी झाली. यानंतर दिप्ती शर्मा आणि पूनम खेमनार यांनी पडझड थांबवली. खेळपट्टीवर स्थिरावल्यानंतर दोघींनी जोरदार आक्रमण केलं.

गुजरात जायंट्स संघाने प्रथम फलंदाजी करताना १५२ धावांची मजल मारली. लॉरा व्हॉल्वरडार्ट आणि कर्णधार बेथ मूनी यांनी ६० धावांची आश्वासक सलामी दिली. ही भागीदारी इक्लेस्टोनने फोडली. यानंतर गुजरातची लयच हरपली. मूनीने एकखांबी नांगर टाकून ५२ चेंडूत १० चौकार आणि एका

### टीम इंडियाला मोठा धक्का!




आयसीसी टी-२० विश्वचषक २०२४ जूनमध्ये अमेरिका आणि वेस्ट इंडिजमध्ये खेळवली जाणार आहे. या स्पर्धेपूर्वी टीम इंडियाला मोठा धक्का बसला आहे. वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी जागतिक दर्जाच्या स्पर्धेतून बाहेर झाला आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे (बीसीसीआय) सचिव जय शाह यांनी याला दुजोरा दिला आहे. त्यांनी सांगितले की, मोहम्मद शमी बांगलादेशविरुद्धच्या घरच्या मालिकेत खेळताना दिसण्याची शक्यता आहे. यावरुन स्पष्ट झाले आहे की, शमी आयपीएल २०२४ आणि टी-२० विश्वचषकाला मुकला आहे.एकदिवसीय विश्वचषक २०२३ मध्ये भारतासाठी सर्वाधिक विकेट घेणारा मोहम्मद शमी नुकताच टाचेच्या शस्त्रक्रियेसाठी लंडनला गेला होता. सोशल मीडियाच्या माध्यमातून त्यांनी ही माहिती दिली होती. आता बातमी आली आहे की तो बांगलादेशविरुद्ध सप्टेंबरमध्ये होणाऱ्या दोन कसोटी आणि तीन टी-२० सामन्यांच्या मालिकेत खेळताना दिसण्याची शक्यता आहे.